महाराष्ट्र शासन
इतर मागास व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**
पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – ४४० ०२२
दूरध्वनी क्र.०७१२- २८७०१२०/२१ CIN No. U८५३००PN२०१९NPL१८७४०५ ई-मेल: mahajyotimjprf@gmail.com

**जावक क्र.महाज्योती/पीएचडी/२०२६-२७/१५७४** **दि.३१/०८/२०२६**

# परिपत्रक

विषय :- महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती (MJPRF) वर्ष २०२४ व २०२५ करीता अर्ज सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत.

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूरमार्फत **महात्मा ज्योतिबा फुले** संशोधन अधिछात्रवृत्ती (MJPRF) योजना राबविण्यात येते. सदर योजनेच्या अंमलबजावणीकरिता महाराष्ट्र शासनाने सर्वंकष धोरण निश्चित केलेले आहे.

त्यानुसार, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूरमार्फत दिनांक ०१ सप्टेंबर २०२३ ते दिनांक ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत पीएच.डी. करीता कायम नोंदणी असणाऱ्या विद्यार्थ्यांकडून महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती (MJPRF) वर्ष २०२४ व २०२५ करीता दिनांक ०१/०८/२०२६ ते ३१/०८/२०२६ या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले आहेत.

सदर अर्ज सादर करण्याच्या कालावधीस मुदतवाढ देण्यात येत असून, पीएच.डी. अधिछात्रवृत्ती वर्ष २०२४ व २०२५ करीता दिनांक ०१ सप्टेंबर २०२३ ते दिनांक ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत पीएच.डी. करीता कायम नोंदणी असणाऱ्या विद्यार्थ्यांना **ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी दिनांक १५/०९/२०२६ पर्यंत** मुदतवाढ देण्यात येत आहे.

तसेच, ऑनलाईन अर्जाची प्रत व अपलोड केलेल्या आवश्यक कागदपत्रांसह **महाज्योती, नागपूर** या कार्यालयात ऑफलाईन पद्धतीने सादर करण्यासाठी **दिनांक १५/०९/२०२६ पर्यंत** मुदतवाढ देण्यात येत आहे.

तरी, संबंधित विद्यार्थ्यांनी सदर मुदतवाढीची नोंद घेऊन विहित मुदतीत ऑनलाईन अर्ज सादर करावा. तसेच, ऑनलाईन अर्जाची प्रत व आवश्यक कागदपत्रांसह महाज्योती, नागपूर या कार्यालयात ऑफलाईन पद्धतीने सादर करावी.

स्वा
(मिलिंद नारिंगे)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन
व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर